# प्रकरण १ ले
## " प्रास्ताविक "

## प्रकरण १ ले

### प्रास्ताविक.

१.१ प्रास्ताविक प्रवेश.

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन.

१.३ संशोधन विषयाचे स्वरुप.
महत्व आणि व्याप्ती.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे.

१.५ गृहित गोष्टी.

१.६ संशोधन पद्धती.

१.७ संशोधन मर्यादा.

१.८ प्रकरणीकरण.

विषय प्रवेश :

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. महात्मा गांधीजी शिक्षणाचा उल्लेख सामाजिक क्रांतीचे मूळ साधन असा करीत असत [An instrument of silent social revolution].

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजतागायत आपल्या पुढे एका एकात्म, सर्वधर्मसमभावी, लोकशाही, समाजवादी अशा भारतीय समाजाचे स्वप्न आहे, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याला अनुरूप असे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवून ते कसोशीने अंमलात आणण्याची नितांत गरज आहे. ही काळाची गरज लक्षात घेऊन केंद्र शासनाने एक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केले.

शिक्षण ही आजची आणि उद्याची एकमेव अव्दितीय अशी गुंतवणूक आहे. हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख तत्त्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सर्व राज्यांकरीता एक किमान राष्ट्रीय अभ्यासक्रम सूचित करण्यात आला आहे. या राष्ट्रीय अभ्यासक्रमामधून एका विशिष्ट स्तरावरील भारतातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्यातील जाती, लिंग, स्थान यातील भेद लक्षात न घेता समान शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा आहे. एकंदरीत आजचा भारतीय समाज कसा आहे व एकविसाव्या शक्तकातील भारतीय समाज कसा असावा ही दोन टोके विचारात घेऊन केंद्र शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये जाहीर केले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अनेक महत्त्वाच्या वैशिष्ट्यापैकी एक

महत्वाचे वैशिष्ट्य कोणते असेल तर ते 'दहा गाभाभूत घटक'. शालेय अभ्यासक्रमातील 'गाभा घटका' ची संकल्पना राष्ट्रीय "विविधतेत एकात्मता" (Unity in Diversity) जपण्याच्या गरजेतून निर्माण झाली आहे. प्रत्येक राज्यातील त्यांच्या सांस्कृतिक, भौगोलिक व ऐतिहासिक गरजानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रमात १० गाभा घटकांचा विचार केलेला आहे.

"भारतातील सर्व राज्यांच्या" समान गरजा लक्षात घेऊन आणि भारताची एकात्मता जोपासण्याच्या दृष्टीकोनातून जे घटक प्राथमिक शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत करणे आवश्यक आहेत, त्या घटकांस 'गाभाभूत' किंवा 'गाभा घटक' असे म्हणतात. राष्ट्रीय अभ्यासक्रमातील हे १० गाभा घटक खालील प्रमाणे आहेत.

१. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.
History of Freedom Movement.

२. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या .
Constitutional obligations.

३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.
Content Essential to Nurture National Idaility.

४. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.
India's common Cultural Heritage.

५. समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता.
Egalitarianism Democrcy and Secularism.

६. स्त्री-पुरुष समानता.

Equality of Sexes.

७. पर्यावरणाचे संरक्षण.

Protection of Environment.

८. सामाजिक अडसरांचे निर्मूलन.

Removal of Social Barriers.

९. लहान कुटुंबाचा आदर्श.

Observance of the Small Family Norms.

१०. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक.

Incculcation of the Scientific temper.

या १० भागाभूत घटकांनी समाविष्ट असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी परिणामकारक होण्यासाठी शालेय स्तरावर अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला. प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची जबाबदारी महाराष्ट्राच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे सोपवण्यात आली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टे, वैशिष्टे व गाभा घटकांचा विचार करुन अभ्यासक्रमाचा अंतिम मसुदा तयार झाला. या मसुद्यास दिनांक ३१ डिसेंबर १९८७ च्या अभ्यासक्रम पुनर्रचना समितीच्या सभेत अंतिम मान्यता देण्यात आली. पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी जून १९८९ पासून राज्यातील सर्व प्राथमिक शाळातून सुरु झाली.

या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सिंहाचा वाटा उचलतात ती पाठ्यपुस्तके. पाठ्यपुस्तके म्हणजे अध्ययन अध्यापनाचे महत्वाचे साधन होय. पाठ्यपुस्तके आभ्यासक्रमाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करतात. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे सिध्द करण्यास मदत करतात. या दृष्टीकोनातून नविन अभ्यासक्रमाच्या अध्यापनासाठी पाठ्यपुस्तके अधिक उपयुक्त ठरावीत म्हणून अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने काही पाठ्यपुस्तकांसबंधी शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी ४ शिफारशी गाभा घटाकांशी संबंधित आहेत, त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. पाठ्यापुस्तकातील विवेचन व भाषा कोणत्याही जाती, जमाती, पंथ, धर्म यांच्या भावना दुखावणारी नसावी.

२. प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकातील विवेचनात १० गाभा घटकांपैकी जास्तीत जास्त गाभा घटक साध्य होतील याकडे विशेष लक्ष दिले जावे.

३. सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरुष समानता व सामाजिक न्याय ही तत्त्वे कटाक्षाने पाळली जावीत.

४. भाषा, सामाजिक शास्त्रे व कार्यानुभव आणि कलाशिक्षण या विषयांच्या पाठ्यपुस्तकामध्ये भारतीय संस्कृतीचा वारसा व राष्ट्रीय अस्मिता जोपसली जावी.

पाठ्यपुस्तकासंबंधी शिफारशी करतांना अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने गाभाघटकांना खूपच महत्व दिल्याचे वरील शिफारशीवरुन दिसून येते. आणि म्हणूनच अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पाठ्यक्रमामध्ये या १० गाभा घटकातील मूल्यांचा विचार केलेला आहे का ? केला असेल तर तो कसा केला आहे? या विचार मंथनातूनच प्रस्तुत संशोधन विषय सुचलेला आहे.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन

प्रस्तुत संशोधन विषयाचे शब्दांकन पुढील प्रमाणे केले आहे.

"प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा - मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे १० गाभाभूत घटकांच्या दृष्टीले केलेले मूल्यमापन." संशोधन हा एक शास्त्रीय अभ्यास आहे. शास्त्रीय अभ्यासात विविध संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. यासाठीच वरील संशोधन समस्येच्या विधानात वापरलेल्या संज्ञाच्या पुढील प्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

प्राथमिक स्तर :

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची पुर्नरचना करीत असतांना ' अभ्यासक्रम पुनर्रचना समिती ' जे काही धोरणात्मक निर्णय घेतले त्यानुसार - 'प्राथमिक स्तर ५ वर्षाचा असेल व तो १ ते ५ पर्यंत राहील.' (प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - १९८८).

संशोधन कार्याकरिता निम्न प्राथमिक स्तरांतर्गत येणाऱ्या इयत्ता पहिली ते पाचवी या वर्गांच्या संदर्भात प्राथमिक स्तर ही संज्ञा वापरलेली आहे.

प्रथम भाषा मराठी :

मराठी ही संज्ञा प्रथमभाषा म्हणून वापरलेली आहे. प्रथमभाषा मराठी ही महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांची मातृभाषा असून ती महाराष्ट्राची 'राजभाषा' सुध्दा आहे. मराठी हा विषय महाराष्ट्रात प्रथम भाषा, द्वितीय भाषा व तृतीय भाषा म्हणूनही शिकविला जातो.

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यात "त्रिभाषा" सुत्रांतर्गत येणारी प्रथम भाषा म्हणून शिकविला जाणारा मराठी हा विषय अशा अर्थाने मराठी ही संज्ञा वापरली आहे.

पाठ्यपुस्तक :

"अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेल्या प्रत्येक विषयाची क्रमबद्ध आखणी म्हणजे पाठ्यक्रम".

पाठ्यक्रमाना अनुसरुन पाठ्यपुस्तके लिहिली जातात.

मराठी विषयातील आशय त्याची पातळी त्यात अंतर्भुत असलेल्या विविध क्षमता, गाभा घटक, अनुभव, संकल्पना यांची संगतवार मांडणी म्हणजे मराठीचा पाठ्यक्रम होय. या पाठ्यक्रमानुसार 'मराठीची पाठ्यपुस्तके' लिहिली जातात.

१० गाभाभूत घटक :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १० गाभा घटक सुचित करण्यात आलेले आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत.

१. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.

२. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या .

३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.

४. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.

५. समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता.

६. स्त्री-पुरुष समानता.

७. पर्यावरणाचे संरक्षण.

८. सामाजिक अडसरांचे निर्मूलन.

९. लहान कुटुंबाचा आदर्श.

१०. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक.

प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे ही वरील १० गाभा घटकावर आधारलेली आहेत. या उद्दिष्टानुसार प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. पर्यायाने पाठ्यपुस्तकामध्ये सुध्दा या १० गाभा घटकांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

मूल्यमापन :

मराठीच्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठामध्ये गाभा घटकांचा अंतर्भाव झालेला आहे का ? झालेला असेल तर कोणत्या गाभा घटकांचा अंतर्भाव झालेला आहे ? 'हे समजून घेण्याचे तंत्र' या अर्थाने ही संज्ञा वापरण्यात आलेली आहे.

## १.३ संशोधन विषयाचे स्वरुप, महत्व आणि व्याप्ती :

संशोधन विषयाचे स्वरुप अतिशय व्यापक आहे. प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम हा १० गाभा घटकांवर आधारलेला आहे. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी पाठ्यपुस्तके ही साधन म्हणून उपयोगी पडतात. परंतु या अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये खरोखरच १० गाभा

घटकातील मूल्यांचा विचार केला गेला आहे का ? पाठ्यपुस्तकातील कोणत्या पाठामध्ये कोणत्या गाभा घटकाचा विचार केलेला आहे, हे लक्षात घेणे महत्वाचे आहे.

या ठिकाणी प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील १० गाभा घटकातील मूल्य शोधण्याच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. यासाठी १ ली ते ४ थी या इयत्तांच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठाचे चिकित्सकपणे वाचन करुन त्यातील कोणत्या पाठामध्ये कोणते गाभामूल्य अंतर्भूत आहे, याचा शोध घेतला आहे.

त्यानंतर गोळा केलेल्या माहितीवरुन इयत्ता, पाठ व अंतर्भूत असलेले गाभा घटक या मुद्यांना अनुसरुन 'सारणी' तयार केली आहे.

वरील संशाधनाचे महत्व विद्यार्थी, शिक्षक व पालक म्हणजेच पर्यायाने समाजाला होणार आहे. कारण या गाभाघटकामध्ये समाजाच्या जडणघडणीसाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचा समावेश केलेला आहे. पर्यायाने समृध्द व संपन्न राष्ट्राची उभारणी होणार आहे.

पाठ्यपुस्तकातील गाभा घटकांच्या अनुरोधाने विद्यार्थ्याचे अध्ययन होणार असल्याने विद्यार्थ्यांचे सर्वांग व्यक्तीमत्व फुलणार आहे. आजचे विद्यार्थी हे देशाचे भावी आधारस्तभं आहेत. उद्याच्या या आदर्श नागरिकांची जडण - घडण अभ्यासक्रमातील या गाभामूल्य संस्कारातूनच होत असते.

कोठारी आयोगानुसार "उद्याचा भारत हा आजच्या शाळेतील वर्ग खोल्यामधून घडत आहे." आजच्या वर्ग खोलीतून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुभूती या पाठ्यपुस्तकाच्या मदतीनेच दिल्या जातात.

शिक्षकांचे अध्यापन हे गाभा घटक स्पर्शी होण्यासाठी हे संशोधन खूपच उपयोगी ठरणार आहे. गाभा घटक संस्कारासाठी वेगळे असे अध्यापनाचे नियोजन शिक्षकांना करता येणार आहे. इयत्ता १ ली ते ४ थी मराठीच्या पाठ्यपुस्तकातील कोणत्याही पाठाच्या अध्यापनापूर्वी त्या पाठामध्ये अंतर्भूत होणाऱ्या गाभा घटकांच्या संस्काराच्या दृष्टीकोनातून शिक्षक आपल्या अध्यापनाचे नियोजन करतील.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाने इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गामधील मराठीच्या दैनंदिन अध्यापन व मूल्यमापन पध्दतीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने निश्चितच मदत होईल.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

१. इयत्ता १ ली ते ४ थी या स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून व्यक्त होणाऱ्या गाभामूल्यांचा शोध घेणे.

२. ही गाभामूल्ये त्या पाठातून प्रतीत होतात का ? ते तपासणे.

३. पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या गाभाभूत मूल्यांचे प्रमाण ठरविणे.

४. पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये पुरेशा प्रमाणात आहेत का? हे तपासणे.

## १.५ गृहित गोष्टी :

प्रस्तुत संशोधनात पुढील गोष्टी गृहित धरलेल्या आहेत.

१. शिक्षण हे विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे महत्वाचे साधन आहे.

२. गाभा घटक संस्कारामुळेच राष्ट्र उभारणीसाठी आदर्श नागरिकाची जडण - घडण होऊ शकते.

३. '१० गाभा घटक' हे मातृभाषेच्या अध्यापनाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

४. प्राथमिक स्तरावरील प्रथमभाषा मराठी विषयांतर्गत गाभा घटकांची जाणीव आणि त्यांचा विकास यांकडे शाळामधून दुर्लक्ष झालेले आहे.

## १.६ संशोधन पध्दती :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. या समस्येच्या संदर्भात सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयुक्त ठरणार आहे. तसेच या सर्वेक्षण पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामग्रीचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण व मूल्यांकन केले आहे. चांगल्या बदलासाठी शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

या संशोधनाकरिता लागणारी सामग्री, संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करुन योग्य मांडणी केली आहे. त्यातून वस्तुस्थितीची कल्पना करता येते. निघणाऱ्या निष्कर्षांचा एकत्र व सूत्रबध्द विचार करुन प्रस्तुत समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना आवश्यक आहे, ते स्पष्ट केले आहे.

## १.७ संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालील प्रमाणे सांगता येतील.

१. हे संशोधन इयत्ता १ ली ते ४ थी च्या प्रथम भाषा मराठी या विषयाच्या पाठ्यपुस्तकांपुरतेच मर्यादित आहे.

२. हे संशोधन प्राथमिक स्तरावरील मराठी या विषयाच्या पाठ्यपुस्तकातील केवळ १० गाभा घटकातील मूल्यांच्या शोधापुरते मर्यादित आहे.

## १.८ प्रकरणीकरण :

अशा प्रकारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथःक्करण करुन तसेच त्याचा अन्वयार्थ लावून त्यावरील आधारित निष्कर्ष व तदनुषंगाने केलेल्या शिफारशी पुढील प्रकरणामध्ये निर्देशित केल्या आहेत.

### प्रकरण १ : प्रास्ताविक

या प्रकरणामध्ये वाचकाला ही समस्या कशी निर्माण झाली याची पार्श्वभूमी सांगून समस्येचे शब्दांकन केले आहे. तसेच समस्येची उद्दिष्टे, महत्व, मर्यादा, कार्यवाही व अहवालतील विविध प्रकरणे यांचा निर्देश करण्यात आलेला आहे.

प्रकरण २ : गाभाघटक - अर्थ व महत्व

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी आवश्यक असणारी सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद केली आहे. प्राथमिक स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पुनर्रचित गाभामूल्याधिष्ठित अभ्यासक्रमाचे स्थान, महत्व, उद्दिष्टे, अभ्यासक्रम रचनेची तत्त्वे, पाठ्यक्रम इत्यादी बाबतील ऊहापोह केला आहे.

प्रकरण ३ : संदर्भ साहित्याचा अभ्यास

या प्रकरणात संशोधन कार्याच्या संदर्भात उपयुक्त ठरणाऱ्या व यापूर्वी झालेल्या संशोधन अहवालांचे तसेच संदर्भ ग्रंथामधील सामग्रीचे संकलन केले आहे.

प्रकरण ४ : संशोधनाची पध्दती

प्रस्तुत संशोधन वर्तमान परिस्थितीशी संबंधित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. या प्रकरणात संशोधन कार्याच्या पध्दती विषयी सर्वेक्षणात्मक पध्दतीच्या अंतर्गत यंणाऱ्या, सामग्रीच्या संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण इत्यादी तंत्राविषयी तपशीलवार उहापोह करण्यात आलेला आहे. संकलित सामग्रीचे संश्लेषण, विश्लेषण, कसे करणार ? याबाबतचे तपशीलवार वर्णन प्रस्तुत प्रकरणांमध्ये आहे.

प्रकरण ५ : गाभाघटकांशी संबंधित सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

इयत्ता १ ली ते ४ व च्या प्रथम भाषा मराठीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमातील १० गाभा घटकांच्या संदर्भात गोळा केलेल्या सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

प्रकरण ६ : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित केलेल्या सामग्रीच्या लावलेल्या अन्वयार्थाच्या सहाय्याने निष्कर्ष काढले आहेत. प्रस्तुत निष्कर्षावर आधारित शिफारशींचा निर्देश केला आहे. तसेच प्रस्तुत समस्येचे अधिक चांगल्या प्रकारे आकलन होण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशाधनासाठी निर्देश केला आहे.